
राजीव तांबे
गुलबो सई
ज्योत्स्ना प्रकाशन





# गुलाबी सई

आज सईचा वाढदिवस होता.

सईच्या घरी तिची सगळी मित्रमंडळी जमली होती.

सईच्या शाळेतल्या बाई पण आल्या होत्या.

आणि विशेष म्हणजे, सईच्या शाळेतल्या बागेचे माळीदादा पण आले होते. सईला गुलाबाच्या फुलांचं खूप वेड होतं, म्हणून माळीदादा तिला गंमतीने 'गुलाबी सई' म्हणत असत.

'वाढदिवसाला येताना कुणीही भेटवस्तू आणायची नाही' असं सईच्या आईनं सर्वांना अगोदरच बजावलं होतं.

पण कसचं काय ? सांगितलेलं ऐकलं तर ती मुले कुठली ?

सगळ्या मित्रांनी सईसाठी निरनिराळी फुले आणली होती. तर तिच्या मैत्रिणींनी सईला बकुळीचे, मोगरीचे,

जाईचे गजरे आणले होते.

सई तर नुसती फुलांत न्हाऊन निघाली होती. सई हळूच आईला म्हणाली सुद्धा, "आई, रोज रोज वाढदिवस असेल तर कित्ती कित्ती मजा येईल किनई ? " आई फक्त हसली आणि तिने सईचा पापा घेतला.

जमलेल्या मित्रमैत्रिणींपैकी कुणी गाणी म्हटली, कुणी कविता. कुणी नाच केला तर काहींनी फुगड्या घातल्या. सर्वात शेवटी सईने लाजत लाजत, 'नाचरे मोरा आंब्याच्या वनात....' हा नाच केला. सर्वांनी जोरदार टाळ्या वाजवल्या. शाळेतल्या बाईंनी सईला शाबासकी दिली. मग सईने सगळ्यांना एकेक खाऊची पुडी आणि गोष्टीचे पुस्तक दिले. मुले हळूहळू आपापल्या घरी परतू लागली.

माळीदादाही घरी जाण्यासाठी उठले. ते सईला म्हणाले, "जरा बाहेर चल बघू. तुझ्यासाठी मी एक छान-छान गंमत आणली आहे." आई ओरडेल म्हणून सई घरात पळू लागली.

माळीदादा ओढतच सईला अंगणात घेऊन गेले. अंगणात ठेवलेल्या गुलाबाच्या कुंडीकडे बोट दाखवून माळीदादा म्हणाले, "हे बघ सई तुझ्यासाठी, माझ्या गुलाबी सईसाठी." सई लाजली आणि घरात पळाली.

आपणाला गुलाबाची कुंडी आणलेली पाहून, आता तर तिला आनंदाने वेड लागायचे तेवढे शिल्लक राहिले होते. ही आनंदाची बातमी सांगायला ती धावतच आईकडे गेली.

दुसऱ्या दिवशी शाळेत, सईला माळीदादा भेटले. त्यांना सईचा चेहरा अगदी प्रसन्न, टवटवीत वाटला. माळीदादांनी सईला विचारताच ती म्हणाली, "माळीदादा, आज किनई सकाळी, आईने हाक मारायच्या अगोदरच मी उठले. सकाळीच गुलाबाला पाणी घातले. मग सगळं आटपून अभ्यासाला बसले. तेव्हाही गुलाबाला थोडं पाणी घातलं. त्याला खूप तहान लागत असेल ना ?

माळीदादा, शाळेत येताना मी पाहिलं तर, झाड थोडंसं वाढल्यासारखं वाटलं मला."

हे सईचं बोलणं ऐकून माळीदादा हसू लागले. ते म्हणाले, "चांगली काळजी घे बरं झाडाची. मस्त तरारून वाढेल बघ, झाड. आणि हो, एक-दोन दिवसाआड मला भेटत जा. झाडाची खबरबात सांगत जा."

सई सुखावली. तिच्या डोळ्यांसमोर मस्त तरारलेली कुंडी आणि त्यावर ऐटित डोलणारे लाल टपोरे गुलाब तिला दिसू लागले.

संध्याकाळी शाळेतून घरी आल्यावर, आईने सईला

दूध आणि बिस्किटे दिली. सई भराभर दूध प्यायली. तिने बिस्किटे फ्रॉकच्या खिशात लपवली अन् ती अंगणाकडे धावली.

आज तिचं खेळात सुद्धा लक्ष नव्हतं. सारखी कुंडीच्या अवती भवती सई घुटमळत होती.

खेळानंतर अभ्यास झाला. अभ्यासानंतर जेवण. जेवता जेवता मधेच सई कुठेशी उठून गेली आणि पटकन् पाटावर येऊन बसली. हे सगळं सईने अगदी गुपचूप केलं होतं.

पण तरीदेखील ते आईला कळलंच. आईने विचारलं, "सई, कुठे गेली होतीस ग ? "

"कुठे नाही. एक गंमत आहे आमची." सई हसतच म्हणाली.

मग आपण तिला नीट विचारू असं ठरवून, आई इतर कामात बुडून गेली.

असेच दिवस जात होते. एका रविवारी कपड्यांचे कपाट आवरताना आई म्हणाली, "काय ग सई, तुझा तो जुना लाल फ्रॉक कुठाय ग ? दिसत नाही कुठे. तू कुणाला दिलास का ? "

हे ऐकताच सई हसू लागली. सई म्हणाली, "मी तो एका गम्माडीत ठेवला आहे. मी नाही सांगणार बाई, मला लाज वाटते." सई हे बोलताना खूप लाजली. अगदी लाजून लाजून लाल झाली.

सईने एक गोष्ट आईपासून लपवून ठेवली होती. तिला कधी वाटे सांगावं आईला. तर कधी वाटे नको. आई उगाच रागावेल.

आईने, सईच्या मनात काय चाललंय ते ओळखलं. तिने सईला जवळ घेतलं. मांडीवर बसवलं आणि म्हणाली, "हे बघ सई, हल्ली तू नीट वागत नाहीस, खरं ना ? तू इतकी हुशार मुलगी, तुझा वर्गात नेहमी पहिला नंबर येतो. तू पेटी सुद्धा किती छान वाजवतेस. पण सध्या तुझं सगळ्यावरचं लक्ष उडालंय ग. मला नाही का सांगणार का ते ? रोज संध्याकाळी दूध भराभर पिऊन तू धावत बाहेर जातेस, तर कधी जेवताना तू गुपचूप बाहेर जाऊन येतेस, हे काय मला माहीत नाही का ? सांग ना ग सई, तुझी कुठली गम्माडी आहे ते. तुझी गम्मत, तीच माझी गम्मत. सांग ना सई लवकर सांग."

हे सारं ऐकून सईच्या डोळ्यात पाणी आलं. पण आपण जर का आईला आपली गम्माडी सांगितली तर आई आपल्याला नक्कीच ओरडेल म्हणून सई घाबरत होती.

आणि दुसरं म्हणजे, ही सगळी गम्मत ती आईसाठीच करत होती. ती आईला एक सुंदर वस्तू भेट देऊन

चकित करणार होती.

सईने डोळ्यातलं पाणी टिपलं. उसनं हसू चेहऱ्यावर आणलं आणि आईला म्हणाली, "मी तुला सांगितलं तर तू रागावणार नाहीस ना ? तू मला मारणार नाहीस ना ? मला ओरडणार नाहीस ना ? "

'नाही ग नाही' आई अगदी काकुळतीने म्हणाली, "तुझं घरात लक्ष नाही. पेटी वाजवताना लक्ष नाही असं पाहिलं की माझंही घरात लक्ष लागत नाही. मला काय करावं ते सुचत नाही ग. आता सांग काय ते लवकर. तुला कुणी काही बोललं का ? तुझ्या हातून काही चूक झाली का ? तुला कुठला त्रास आहे ? सांग लवकर सई. असा उगा वेळ काढू नकोस."

मग मात्र सई हसली. म्हणाली, "आई तू अजिबात काळजी करू नकोस. मला कुणीही बोललं नाही की रागावलं नाही. मला कुठला त्रासही नाही. माझी गम्माडी ह्यापेक्षा वेगळीच आहे. मी ती तुला आत्ता सांगणार नाही, पण बाबांना मात्र संध्याकाळी सांगेन. अगदी नक्की."

आईला हायसे वाटले.

मग सावकाशीने सईच्या बाबांना विचारता येईल असं ठरवून आईने हा विषय डोक्यातून काढूनच टाकला. आईने हलकेच सईचा पापा घेतला. सई अंगणात खेळायला पळाली. आई घरात कामाला गेली.

संध्याकाळी सई खेळून घरी आली तर तिच्या अंगात ताप होता. सतत बडबड करणारी, दंगा करणारी सई तापामुळे अशक्त झाली.

संध्याकाळी बाबा कामावरून घरी आले आणि लगेच डॉक्टरला बोलवायला गेले.

डॉक्टर आले. डॉक्टरांनी तपासलं. म्हणाले, "विशेष काळजी करण्याचं कारण नाही. पण मी औषधे देतो ती सईला द्या. सईला विश्रांतीची खूप आवश्यकता आहे." डॉक्टरांनी सईला थोपटलं. तिच्या डोक्यावरून मायेने हात फिरवला. उद्या येतो असे सांगून डॉक्टर निघून गेले.

थोड्या वेळाने सई तापात बोलू लागली, "पाणी द्या, पाणी द्या. ऊन पडलं खूप."

आईला वाटले सईला प्यायला पाणी हवे आहे. आई पटकन् उठली, पाणी घेऊन आली. पण सईने खुणेनेच मला नको असे सांगितले.

आईने पुन्हा विचारले, "तुला पाणी हवं का ग सई ? " सईने फक्त खिडकीकडे बोट दाखविले. तिला खूप अशक्तपणा आला होता. त्यामुळे सई न बोलताच झोपून गेली.

आई अधिकच अस्वस्थ झाली. तिला काय करावे सुचेना.

असेच दोन-तीन दिवस गेले. औषध चालूच होतं. पण सईची तब्येत काही सुधारेना. दुपारी आई झोपली की सई खिडकीत बसे. उदासपणे अंगणाकडे पाहत राही. सई कंटाळून जाई. पुन्हा जरा वेळाने अंगणाकडे पाहत राही.

सईची तब्येत सुधारेना म्हणून आईलाही जेवण जाईना. आईची तब्येतही खालावली. आई सईला गोष्टी सांगे, पण सई मात्र नाराज होती. खिन्न होती. उपाय काही मिळेना. सई काही हसेना.

सईची तब्येत बिघडली आणि ते हसरं खेळतं घर शांत-शांत झालं.

खूप दिवस सई शाळेत दिसली नाही म्हणून चौकशी करायला माळीदादा सईच्या घरी आले. घरी येताना माळीदादा अंगणातून आले.

अंगणात सईची गुलाबाची कुंडी होती. तिला पाहताच माळीदादांना सईच्या आजारपणाचं कारण कळलं. माळीदादा हसले आणि मनाशीच म्हणाले, "हं, उद्या सई शाळेत येईलच येईल."

माळीदादांनी कुंडी साफ केली. त्यावेळी त्यांच्या डोळ्यात आनंदाश्रू आले होते.

गंमत अशी झाली होती की, सईचं गुलाबच्या झाडावर अतोनात प्रेम होतं. पण ते झाड काही केल्या वाढेचना. तिचं लाडकं झाड सुकत चाललं होतं. ह्याचाच धसका घेऊन सई आजारी पडली होती.

माळीदादांनी जेव्हा कुंडी साफ केली तेव्हा त्यांना कुंडीत पुरलेली बिस्किटे, चॉकलेट, पोळीचे तुकडे मिळाले. हे सर्व त्यांनी काढून टाकलं. कुंडीत छानपैकी माती घातली.



झाडाला एक छोटासा लाल रंगाचा जुना फ्रॉक गुंडाळलेला होता. त्यामुळे झाडाच्या फांद्या दबल्या गेल्या होत्या. तो फ्रॉक माळीदादांनी काढून टाकला. आणि फांद्या मोकळ्या झाल्या.

कुंडी देखील सावलीत होती, ती माळीदादांनी उचलून नीट उन्हात ठेवली.

अंगणातच हातपाय धुऊन माळीदादा घरात गेले. माळीदादा सईला भेटून म्हणाले, ''काय ग सई ? किती हाल करतेस कुंडीचे ? मी आता सगळं नीट केलंय. तू आता काही काळजी करू नकोस. दोन दिवसात झाड कसं वाढेल बघ.''

असं माळीदादांनी म्हणताच सईला खूप उमेद वाटली. खूप दिवसांनी सई हसली आणि म्हणाली, ''माळीदादा, तुम्ही दिलेलं झाड मला खूप आवडलं. ते माझ्याशी बोलायचं, मी जवळ गेले की हंसायचं. मी जेवताना, काही खाताना मला झाडाची खूप आठवण यायची.

झाडाला न देता आपण एकट्याने कसं खायचं ? म्हणून मी थोडी बिस्किटे झाडाला देत असे.

आणि माळीदादा तुम्ही सुद्धा त्या इवल्याशा छान-छान झाडाला उन्हात ठेवलंत. मला अस्सा राग आला किनई. बिचारं झाड करपून जाईल उन्हात. म्हणून मी त्या इवल्या झाडाला थंडगार सावलीत ठेवलं.

आणि त्या सानुल्याला रात्री थंडी वाजेल म्हणून त्याला माझा एक जुना पण चांगला फ्रॉक दिला.

इतके लाड केले तरी ते झाड काही वाढेचना. ह्या झाडाचं पहिलं फूल मी आईला देणार होते. तिला चकित करणार होते. माळीदादा, म्हणून मी ही गम्मत माझ्या आईलाही सांगितली नाही हो. माळीदादा, खरंच माझं झाड वाढेल ना हो ? त्याला फूल येईल ना ? ''

एवढं सगळं भराभरा बोलल्यावर सईला धाप लागली. सई अंथरूणात शांत पडून राहिली.

सईचं सगळं बोलणं आई लक्षपूर्वक ऐकत होती. आईला आणि माळीदादांना ह्यावर काय बोलावं तेच कळेना. त्यांचे डोळे पाणावले होते.

माळीदादांनी डोळे टिपले. सईला थोपटलं. तिला प्रेमाने कुरवाळले आणि निघून गेले. हं, जाताना मात्र सईसाठी आणलेला गुलाबाच्या फुलांचा गुच्छ त्यांनी सईच्या उशाशी ठेवला.

माळीदादा कधी गेले ते सईला कळलंच नाही. सई थकून गाढ झोपली होती. सईला स्वप्नात भरगच्च गुलाबांची बाग दिसत होती.

खरंच दोन दिवसात झाडाने चांगलाच जोम धरला. सईची तब्येतही झपाट्याने सुधारू लागली.

जसजसे झाडाला कोंब फुटू लागले, कळ्या येऊ

लागल्या तसतसे सईचे हसणे-खेळणे सुरू झाले.

सई पुन्हा पूर्वीसारखी नाचू बागडू लागली. आनंदाने मन लावून पेटी वाजवू लागली. आईलाही बरं वाटलं. सईला आवडतात म्हणून आईने मुद्दामहून लाडू केले.

पण ह्यावेळी सईने झाडाला त्रास दिला नाही. सगळे लाडू तिने मट्ट करून टाकले.

जेव्हा गुलाबाचे पहिले फूल झाडावर आले, त्यावेळी



सईला खूप खूप आनंद झाला. सई आनंदाने अंगणात उड्या मारू लागली. स्वतःभोवती गिरक्या घेऊ लागली. हे पहिलं टपोरं, हसरं, नाचरं फूल आपण न घेता आपल्या आईला द्यायचं, ह्या कल्पनेनेच सई मोहोरून गेली. सईने अगदी हळूवारपणे फूल कापले आणि उड्या मारतच घरात गेली. सईने धावत जाऊन आईला मिठी मारली. सईचे डोळे आनंदाने ओलावले होते. सईचा कंठ दाटून आला होता. तिला बोलताही येईना. सईने कशीबशी हाक मारली, "आऽऽई..." आणि आपल्या हातातले फूल तिच्यासमोर धरले.

आईने सईच्या डोळ्यात पाहिलं आणि सारं ओळखलं. आईने पटकन् सईचा पापा घेतला. आई म्हणाली, "सई बाळा, पहिलं फूल मला नव्हे, पहिलं फूल देवबाप्पाला."

सईला ते पटलं. सईने ते फूल देवबाप्पाला दिलं.

सई शाळेत गेली. माळीदादा तिला आपल्या बागेत घेऊन गेले. माळीदादा म्हणाले, "सई, तुझं झाडांवर खूप प्रेम आहे, हे मला कळतं. पण आपल्या प्रेमाचा त्रास झाडांना होता कामा नये. झाडांना हवा असतो भरपूर सूर्यप्रकाश, कसदार माती आणि पुरेसं पाणी."

मग माळीदादांनी सईला झाडांची निगा कशी राखायची, कुंडीत माती कशी भरायची हे शिकवलं.

सईलाही खूप आनंद झाला. बरं वाटलं. आता आपल्या झाडाची नीट काळजी घ्यायचं तिनं मनापासून ठरवलं.

जेव्हा शाळेतून संध्याकाळी सई घरी आली तेव्हा तिला कुणीतरी हाक मारल्याचा भास झाला, म्हणून ती कुंडीजवळ गेली. तर गुलाबाचे झाड तिच्याकडे पाहून हसत हसत म्हणाले,

"सई ग सई, काय ग बाई
तुझी तर बुवा, खूपच घाई,
सई ग सई, वेडाबाई
तू तर आमची, गुलाबी सई"

हे ऐकताच, सई खुदकन् लाजली आणि घरात पळाली.

# गोड गोड मित्र

मे महिन्याच्या सुट्टीत आम्ही कोकणात जातो. ह्या दिवसात काजू, जांभूळ, आंबे, फणस ह्यांची झाडे फळांनी लगडलेली असतात. लागेल तेवढे आंबे-फणस खावेत, काजू खावेत. मजा मजा करावी.



सकाळ संध्याकाळ आंबरस पुरी, तब्येत कशी होते बरी. मधल्या वेळी खायचा फणस, झोपताना मात्र गोड अननस. असे गोड गोड दिवस जात होते.

आपली शाळा, अभ्यास, गृहपाठ हे तर आम्ही सर्व मुले कधीच विसरून गेलो होतो.

एकदा दुपारी आंबे काढण्याकरिता आम्ही सर्व मुले आंब्याच्या झाडाकडे गेलो.

झाडाखाली गार गार सावली होती.

सुंदर वारा सुटला होता.

नुकतंच पोटभर जेवण झाल्याने, आम्हाला झाडावर काही चढता येईना.

मग आम्ही सर्वजण सावलीत बसलो.

काही मुलांनी आजूबाजूचे दगड गोळा करून आणले. झाड तर पिवळयाधमक आंब्यांनी डवरलेले होते. आमची पोटं तुडुंब भरली होती. पण तरीही हे मस्त रसाळ आंबे पाहताच तोंडाला पाणी सुटलं. काही आंबे तर इतके जवळ होते की, छोट्याशा काठीने सुद्धा काढता आले असते. आमच्यातल्या काही लंबूटांग मुलांनी उड्या मारून पाहिल्या. पण त्यांना काही जमेना.

आमच्यातला एक मुलगा म्हणाला, "आंबे काढायला उडी मारली की झाडसुद्धा थोडंसं उंच जातं. अगदी खरं !"

आम्ही सगळेच हसलो त्याला.

आम्ही सगळयांनी बरोबर नेम धरून दगड मारायला सुरुवात केली. पण काय गंमत ?

आंब्याला दगड लागेचना. प्रत्येकाचा नेम चुकायचा.

नव्हे, नव्हे ! आम्ही दगड फेकला की खरंच झाड थोडं उंच जायचं.

आम्ही दगड मारून कंटाळलो आणि झाडावर रागावलो.

मग झाडाच्या सावलीत बसून गप्पा मारू लागलो. गाण्याच्या भेंड्या खेळू लागलो.

इतक्यात एक खूप खूप म्हातारा माणूस तिथे आला, अन् सावलीत बसला.

चालताना त्याची मान हाले आणि त्यामुळे त्याची पांढरीशुभ्र दाढीसुद्धा लुटूलुटू हाले.

तो म्हातारा सावलीत येऊन बसताच झाडाला अत्यंत आनंद झाला. त्याची पाने सळसळू लागली. फांद्या अजून खाली वाकल्या आणि सावली सुद्धा दाट झाली.

त्या म्हाताऱ्या आजोबांनी झाडाला कुरवाळले, थोपटले, झाड अधिकच खुलले.

मग झाडाची एक फांदी खूप खूप खाली आली. अगदी आजोबांच्या हाताजवळ.

आजोबांनी दोन-चार आंबे सहज काढले. मग ती फांदी चटकन वर गेली. आनंदाने डोलू लागली.

हे सगळं पाहून तर आम्हा मुलांना खूप आश्चर्य वाटले.

आम्ही मुले झाडाला म्हणालो, "आम्हांला दे की रे आंबे !"

तर झाड फक्त हसले.

झाड हसतच म्हणाले, "मुलांनो उड्या मारून किंवा दगड फेकून गोड रसाळ आंबे मिळत नाहीत. त्यासाठी आपणसुद्धा सगळ्यांशी गोड वागावं लागतं. अरे, माझ्या मित्रांनो, मी त्या मुलाला म्हणजे तुमच्या त्या आजोबांना आंबे का दिले माहीत आहे का ? ती एक मोठी गोष्ट आहे."

गोष्ट म्हणताच आम्ही सारी मुले नाचू लागलो.

तेव्हा झाडाने आम्हाला थोडे दटावले. झाड म्हणाले, "तुम्हाला गोष्ट ऐकायची आहे ना ? मग असे नाचू नका. आता आजोबा थोडी विश्रांती घेणार आहेत. तुम्ही मुले जरा त्यांच्यापासून लांब बसा पाहू."

एव्हाना आजोबा झाडाला टेकून, डोळे बंद करून, पाय पसरून शांत बसले होते.

आम्ही मुले आवाज न करता दुसऱ्या बाजूला सावलीत जाऊन बसलो.

झाड गोष्ट सांगायला सुरुवात करणार इतक्यात झाडावर कावळ्यांची काव काव सुरू झाली. आम्हा मुलांना फार राग आला. पण त्याचवेळी झाडाच्या दोनच फांद्या अशा काही जोरात हलल्या की सगळे कावळे घाबरून भुर्रदिशी उडून गेले.

आणि झाडाने गोष्ट सांगायला सुरुवात केली.

"आत्ता जे तुमच्या बाजूला आजोबा आहेत ना, त्यांच्या वडिलांनी मला इथे आणून लावलं.

मी लहान असताना खूप अशक्त होतो. कमजोर होतो. जरा जोरात वारा आला तरी माझी मान डुगूडुगू हलत असे. आणि मी आता पडतो की, मग पडतो असं मला वाटत असे.

ही गोष्ट खूप खूप जुनी आहे मुलांनो. त्यावेळी हे तुमचे आजोबा लहानगे होते. हो, तुमच्यापेक्षाही लहान बरं !

माझी ही वाईट अवस्था पाहून ह्या छोट्या मुलाने, एक लहानशी काठी आणली आणि मला आधार दिला.

कुठूनशी चांगली लाल माती आणली. आणि माझे पाय घट्ट केले.

रोज नेमाने सकाळ-संध्याकाळ तो मला पाणी घालायचा. माझी विचारपूस करायचा. मला वेळोवेळी खतपाणी द्यायचा.

हळूहळू आमची दोघांची गट्टी जमली.

शाळेतल्या गंमती तो मला सांगायचा. झाडांच्या गंमती मी त्याला सांगत असे.

तो हळूहळू मोठा झाला. मीही मोठा होत होतो. पण तो मुलगा मला कधीच विसरला नाही.

एखाद दिवस जर तो मला भेटायला आला नाही तर मला फार बेचैन वाटे.

एक गंमत सांगतो तुम्हाला.

एकदा पावसाळा होता. खूप पाऊस पडत होता. सगळीकडे पाणीच पाणी झालं होतं.

पण सवयीने हा मुलगा जेवायच्या अगोदर, हातात छत्री घेऊन मला पाणी घालायला आला.

त्याला पाहून मी लागलो हसायला.

मी हसत म्हटलं, ''अरे वेड्या, आभाळ फाटल्यासारखा पाऊस पडतोय, तर आणखी तू काय मला पाणी घालणार ? ''

हे ऐकल्यावर तो मुलगा रागावला. जसा आला तसाच निघून गेला. मलाही वाईट वाटलं. आपण असं बोलायला नको होतं असं वाटलं. मी त्याला तसं सांगणारही होतो. पण तोपर्यंत तो खूपच लांब निघून गेला होता. मी त्याला जोरजोरात हाका मारल्या. पण वारा उलट दिशेने वाहत असल्याने त्याला माझ्या हाका ऐकू आल्या नाहीत.

त्या दिवशी मला खूप वाईट वाटलं. मित्र जोडायला वेळ लागतो. पण आपण कधीतरी उगाच वेडेपणा करतो आणि ही अशी जमलेली मैत्री...! अरेरे ! आता काय करावं बरं ? मला तर काही सुचेना.

दुसऱ्या दिवशी पाऊस पळाला. स्वच्छ ऊन पडलं, पण तो काही आलाच नाही.

मी खूप वाट पाहिली.

मला काळजी वाटायला लागली.

आता कसं करावं ? ह्याची समजूत कशी काढायची ?

आम्हा झाडांना काही तुमच्यासारखं फिरता येत नाही. वाटेल तिकडे जाता येत नाही. एकदा ज्या ठिकाणी उभं राहायचं, बस्स. जन्मभर तिथेच. मी खूप काळजीत होतो.

इतक्यात, शेंड्यावरची पाने सळसळली.

उंचावरच्या फांद्या आनंदाने डोलू लागल्या.

पाने म्हणाली, ''आला. तुझा मित्र आला. आपल्या सगळ्यांचा मित्र आला.''

मला अतिशय आनंद झाला. खूप खूप बरं वाटलं.

तो जवळ येताच आपण त्याची माफी मागायची. आपण आपली चूक कबूल करायची असं मी ठरवलं.

तो लांबून येताना दिसला तर त्याच्या हातात एक पिशवी होती. चांगली जाडजूड पिशवी.

तो धावतच माझ्याजवळ आला. माझ्याकडे नीट बघत म्हणाला, "हे बघ, तुझ्यासाठी छान खत आणलंय. अरे, काल दिवसभर खताचे खड्डे उपसत होतो, म्हणून यायला वेळ मिळाला नाही."

तो पुढे म्हणाला, "अरे, पावसात मातीची धूप होते. म्हणून मी मुद्दाम ही चांगली कसदार माती आणि खत घेऊन आलोय. अरे, चांगलं जोरात वाढलं पाहिजेस तू."

त्या मुलाचं माझ्यावरचं प्रेम पाहून मला खूप भरून आलं. क्षणात सगळी पाने एकदम सळसळली आणि शांत झाली.

त्या मुलालाही कळलं काय ते !

त्याने मला प्रेमाने थोपटलं आणि म्हणाला, "मी काही रागावलो नाही तुझ्यावर. तू परवा मला म्हणालास, वेडा की काय ? तर, मी वेडाच आहे. तुझ्या मैत्रीसाठी ! "

मग मात्र माझ्याने राहवेना. अतीव आनंदाने माझी पाने सुद्धा ओलसर झाली. मी सगळ्या फांद्या खाली वाकवल्या आणि त्या मुलाला प्रेमाने घट्ट मिठी मारली.

तुमच्या रामायणातल्या भरतभेटीची मला आठवण झाली.

हा प्रसंग ऐकून आम्हा मुलांना सुद्धा गहिवरून आलं.

इतक्यात झाड म्हणाले, "मुलांनो, मी तुम्हाला अजून एक गंमत सांगणार आहे." झाड पुढे बोलू लागले, "जसजशी तुम्ही माणसे मोठी होता तसतसे तुम्ही म्हातारे होता.

तुमचे केस पिकतात. तुम्हाला कमी दिसतं. कमी ऐकू येतं. हातापायातली शक्ती कमी होते.

पण आमच्या झाडांचं मात्र ह्याच्या एकदम विरुद्ध आहे. आम्ही जसजसे मोठे होतो तसतशी आमची शक्ती वाढत जाते. आमचा घेर वाढतो. आमच्या फांद्या वाढतात. त्या जाड्या होतात. आमचे पाय अधिकाधिक घट्ट होतात. आम्हाला नवा जोम येतो. आहे किनई गंमत ?

आता हे बघा मुलांनो, हा माझा लहानपणापासूनचा मित्र. तो आता म्हातारा झाल्यावर त्याला मी मदत करायला हवी किनई ?

म्हणून तो आला की, मी माझ्या फांद्या जवळ जवळ आणतो आणि त्याच्या डोक्यावर गार गार सावली पडेल असं पाहतो.

त्याला भूक लागली असेल तर मी प्रेमाने खाली वाकून त्याला माझी फळे देतो.

आंबे खाऊन तो खूश झाला की, मलाही आनंद

होतो.

माझी ही गोड रसाळ फळे तुम्हा सर्वांसाठीच आहेत. तुमच्यासारख्या लहान मुलांनी माझी फळं खाल्ली की मला बरं वाटतं."

असं म्हणत झाड पुन्हा एकदा प्रेमाने खाली वाकले. आम्हा सर्वांना त्याने आंबे दिले. झाडाची गोष्ट संपली तेव्हा झाडाची पाने सळसळत होती.

गोष्ट संपेपर्यंत संध्याकाळ झाली.

ही गोड गोड मित्राची गोष्ट कधी एकदा घरी जाऊन आईला सांगतो, असं आम्हाला झालं होतं.

आम्ही झाडाला प्रेमाने थोपटलं.

आजोबांना नमस्कार केला.

आणि

आंबे घेऊन घराकडे धूम ठोकली.

# आमचा जंगल मित्र

परीक्षा संपली की खूप मोठी उन्हाळी सुट्टी सुरू होते. आम्ही तर ह्याला मजेची सुट्टी म्हणतो. ह्या सुट्टीत गावाला आम्ही सगळी भावंडं एकत्र जमतो.

चैतन्य, स्वप्ना, शिल्पा, सई, गायत्री, आनंद, अंगजा असे आम्ही सर्वजण दिवसभर खेळत असतो.

सकाळी उठल्यावर आंघोळ-बिंघोळ करून पत्ते कुटत बसायचं. दुपारी साप-शिडी खेळायची. संध्याकाळी लपंडाव, सागरगोटे, चोर-पोलीस असे खेळ. आणि रात्री मात्र जेवण झाल्यावर अंगणात बसून काकांची वाट पाहात असू. काका आम्हाला त्यांच्या खास आवाजात भुताची गोष्ट सांगत. भुताची गोष्ट ऐकायला आम्हाला खूप आवडे. आम्ही कोणी भीत नसू. पण थोड्या वेळाने आपोआपच आम्ही एकमेकांचे हात घट्ट धरत असू.

अंगणाच्या पलीकडे गर्द झाडी होती. वाऱ्याने झाडे हलली की उगाच कुणीतरी आपल्याला हात करतंय असं वाटे.

त्यामुळे गोष्ट ऐकाविशी वाटे पण बाजूला पाहायला भीती वाटे.

गोष्ट कधी एकदा संपते आणि आपण डोक्यावर पांघरूण घेऊन कधी झोपतो असे वाटे.

काल रात्री गोष्ट सांगता सांगता काका म्हणाले, "मुलांनो तुम्ही गावाबाहेरच्या जंगलात का बरं खेळायला जात नाही. ?"

आत्ता एवढ्या रात्री, गर्द काळोखात जंगलात जायचं ! बापरे ! आमची भीतीने गाळण उडाली. कुणीच काही बोलेना. आम्ही घरात पळण्यासाठी चुळबूळ करू लागलो. आमची अवस्था पाहून काका जोरात हसले.

क्षणभर आम्ही सगळे घाबरलोच.

इतक्यात काका हसतच म्हणाले, "अरे वेड्यांनो, आत्ता नव्हे ! उद्या सकाळी जा असं म्हणतोय."

मग आम्ही सर्व हसत हसत घरात पळालो.

आम्ही सर्व सकाळी लवकर उठलो. भराभरा सगळं आवरलं. काकूने, आजीने आम्हाला खाऊचे डबे तयार करून दिले.

सकाळच्या सुखद गारवा असतानाच आम्ही घर सोडलं. आणि जंगलाच्या वाटेवर चालू लागलो.

पहाटे पडलेल्या दवाने पाऊलवाट सुद्धा मऊ ओलसर झाली होती. झाडाझाडांवर पक्ष्यांचा किलबिलाट सुरू होता. असं वाटलं की आपणही गाणी म्हणावीत.

इतक्यात एक फुलपाखरू स्वप्नाच्या कानाजवळून भुर्रकन् उडून गेलं. ती क्षणभर घाबरलीच. शिल्पा हसत म्हणाली, "अय्या ताई, घाबरतेस काय ? अग तू छानपैकी गाणं म्हण, असं ते फुलपाखरू तुला सांगायला आलं होतं. हो. अगदी खरं !"

मग आम्ही सगळ्यांनी एकच गलका केला, "स्वप्नाताई गाणं म्हण. स्वप्नाताई गाणं म्हण." स्वप्नाताई गाणं म्हणू लागली. हळूहळू तिच्यासोबत आम्ही सुद्धा गाऊ लागलो.

गाणी म्हणत, उड्या मारत आम्ही जंगलात पोहोचलो. थंडगार सावलीचं, डेरेदार झाड पाहून आम्ही सर्व त्या झाडाखाली बसलो.

आम्ही झाडाखाली बसताच चैतन्य म्हणाला, "चला खाऊ खाऊया."

आनंद म्हणाला, "खाऊ नको, आपण झाडावर चढूया."

स्वप्ना व सई म्हणाल्या, "त्यापेक्षा आपण गाण्याच्या भेंड्या खेळू बाई. कित्ती मजा येईल."

गायत्री म्हणाली, "नको बाई गाण्याच्या भेंड्या. मला कंटाळाच येतो. त्यापेक्षा आपण सागरगोटे खेळू. मी मुद्दाम आणले आहेत सोबत. कोण-कोण खेळणार माझ्या सोबत, त्यांनी हात वर करा पाहू."

अंगजा रागावूनच म्हणाली, "तुम्हाला बाई काहीच

कसं कळत नाही. सागरगोटे काय, आपल्याला घरी पण खेळता येतील. आणि आम्ही लहान मुली झाडावर कशा काय चढणार ? आपण असं करू. आपण सगळे जंगलात फिरून येऊ.

चैतन्य वेडावून दाखवत म्हणाला, ''पण नुसतं फिरून काय करणार ? त्यापेक्षा खाऊच खाऊ की ! ''

अंगजा चैतन्यची समजूत काढत म्हणाली, ''अरे, चेतन्यदादा असं काय करतोस ? आपण निरनिराळ्या झाडांची पानं जमवूया. रंगीबेरंगी फुलं गोळा करूया. झऱ्यावर जाऊन पाणी पिऊया. झऱ्यातले रंगीत दगड वेचून आणूया.''

पण कुणालाच दुसऱ्याचं म्हणणं पटेना.

चैतन्यला अगदी आत्ताच खाऊ हवा होता. तर आनंदला लगेच झाडावर चढायचं होतं आणि गायत्रीला सागरगोटे. अंगजाला एकटं फिरायची भीती वाटत होती.

कुणीच कुणाचं ऐकायला तयार नव्हतं. प्रत्येकाला वाटे आपलंच सगळ्यांनी ऐकलं पाहिजे. मी मात्र मला हवं तसं वागणार.

आता आम्ही सर्व भांडणार, मस्ती करणार, गडबड करणार....

इतक्यात....

झाड म्हणाले, ''थांबा मुलांनो ! तुमच्यासारख्या हुशार मुलांनी असा हट्टीपणा केलेला पाहून मला फार वाईट वाटतं. तुमच्या सर्वांचं म्हणणं मला पटतं. खाऊ खाल्ला पाहिजे, गाण्याच्या भेंड्या-सागरगोटे खेळले पाहिजेत, जंगलात फिरलं पाहिजे, झऱ्यात गेलं पाहिजे. पण हे सर्व न भांडता, न मस्ती करता.''

आम्ही सर्वजण एकदम म्हणालो, ''पण असं कसं होणार ? ''

झाडाची पानं सळसळली. झाड हसतच म्हणाले, ''बरं झालं आज तुम्ही माझ्या सावलीत बसलात. मी आता तुम्हाला एक गंमत दाखवणार आहे.''

गंमत पाहायला मिळणार हे ऐकल्यावर आम्ही सगळं विसरून गेलो आणि आनंदाने झाडाभोवती फेर धरून नाचू लागलो.

झाड सुद्धा खुशीत येऊन डोलू लागले.

मग आम्ही शांतपणे झाडाच्या सावलीत बसलो.

झाड म्हणाले, ''मुलांनो तुमचा हा नाच मला फार आवडला. तुम्ही असंच खेळीमेळीनं राहिलं पाहिजे.

तुम्हाला माहीत आहे का ? माझ्या अंगावर असंख्य मुंग्यांची धावपळ सुरू असते आणि तेही लाल मुंग्या, काळ्या मुंग्या, पिवळ्या मुंग्या. ह्या एवढ्या लाखो मुंग्या एकाच झाडावर असून त्यांचं कधी आपापसात भांडण होत नाही. आपल्यामुळे इतरांना त्रास होऊ नये, आपला

धक्का इतरांना लागू नये म्हणून त्या व्यवस्थित ओळीतून फिरतात.

ते बघा, त्या फांदीवर चिमणीचं आणि साळुंकीचं घरटं बाजूबाजूला आहे.''

''कुठाय-कुठाय ? आम्हाला नाही दिसत.'' आम्ही म्हणालो.

अंगजा म्हणाली, ''तू किती रे उंच ! आम्हाला काहीच दिसत नाही. आणि आम्हाला बाई तुझ्या अंगाखांद्यावर चढायला भीती वाटते.''

''बरं बुवा. आत्ताच मी थोडा बुटका होतो.'' असे म्हणत झाड खरोखरच बुटके झाले.





झाड बुटके होताच चिमणीचे व साळुंकीचे घरटे आम्हाला दिसू लागले.

झाड म्हणाले, "ह्या दोघी अगदी बाजूबाजूला राहतात पण भांडण कधी नाही."

आम्ही कुतूहलाने त्यांची घरटी पाहत होतो इतक्यात चिमणीच्या घरट्यात वरतून एक कसलेसे छोटे लाल फळ पडले. चिमणीची पिल्ले एकदम घाबरली. टूपकन् घरट्यात गेली. थोड्यावेळाने बाहेर डोकावून पाहिलं तर इवलंसं लाल फळ. त्यांना खूप आनंद झाला. ती छोटीशी पिल्लं आपले पंख फडफडावू लागली. ते फळ तर त्यांच्या आवडीचं होतं. ते फळ, चिमणीची पिल्ले खाणार इतक्यात शेजारच्या घरट्यातून त्यांनी ची ची असा आवाज ऐकला. बिचारी साळुंकीची पिल्ले भूक लागल्याने आपल्या आईला हाका मारीत होती.

आपल्या मित्रांचा असा आवाज ऐकताच त्या चिमणीच्या पिल्लांना रडूच कोसळलं. त्यांनी ते इवलंसं लाल फळ साळुंकीच्या पिल्लांना दिलं.

इतक्यात एक खार धावत-पळत, उड्या मारत तिथे आली. आपली झुपकेदार शेपटी ऐटीत उडवत म्हणाली, "काय रे मुलांनो, तुम्हाला एक छोटंसं लाल फळ मिळालं का ? मी ह्या फांदीवरून त्या फांदीवर उड्या मारत असताना ते माझ्या हातून पडलं."

खारीचं बोलणं ऐकताच ती लबाड पिल्लं म्हणाली, "हो, मिळालं की आम्हाला ते लाल फळ." आम्ही अगदी ते व्यवस्थित ठेवलंय. तू काही काळजी करू नकोस खारूताई."

खारूताईला बरं वाटलं. ती म्हणाली, "द्या बरं ते फळ. मला उशीर होतोय."

हे ऐकताच ती पिल्लं हसू लागली. हसतच म्हणाली, "अग खारूताई, व्यवस्थित ठेवलंय म्हणजे आमच्या पोटात ठेवलंय. पोटात ठेवलेलं फळ कुणाला पळवता येणार नाही ना, म्हणून आम्ही म्हणालो व्यवस्थित ! "

ह्या गमतीवर सगळेच हसले. खारूताईने न रागावता आपल्याजवळ असलेली दोन फळेही त्यांना व्यवस्थित ठेवायला दिली. खारूताई उड्या मारत पळून गेली.

झर्रकन् झाड उंच झाले. आम्हाला राग आला. इतकी छान गंमत बघायला मिळत होती. पण झाड म्हणाले, "अरे, आम्हाला नेहमी पायावर उभं राहायची सवय. असं गुडघ्यावर उभं राहून माझे पाय दुखू लागले."

झाड पुढे म्हणाले, "बघितलंत ना मुलांनो, ती चिमणीची पिल्लं सुद्धा भांडत नाहीत. एवढंच काय पण माझ्या अंगाखांद्यावर अनेक प्राणी-पक्षी राहतात. अगदी गुण्यागोविंदाने राहतात. मग, माझ्याच सावलीत खेळणारी ही मुले का बरं भांडतात ? "

झाड एकदम गप्प झाले.

आम्हालाही कसंसच वाटलं आणि झाडाचं म्हणणं पटलं.

खरं सांगतो मित्रांनो, हा जंगलचा मित्र आम्हाला भेटल्यापासून आम्ही कधीच कुणाशी भांडलो नाही. ही गोष्ट वाचणारी मुले देखील कधीच कुणाशी भांडत नाहीत.